शनिवार, दि. ११ ऑक्टोबर २०२५ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक ५२ वा ● किंमत २ रु. ● पाने ०४ 8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल ॲण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

## शासनाचा नवा जीआर; ३४ जिल्ह्यातील ३४७ तालुक्याचे नुकसान

# दहावी बारावी विद्यार्थ्यांची फी माफीचा निर्णय

मुंबई : पूरग्रस्त आणि अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांसाठी राज्य सरकारनं ३१ हजार ६२८ कोटी रुपयांचं पॅकेज जाहीर केलं आहे. या पॅकेज संदर्भातील जीआर सरकारने काल जाहीर केला होता. यामध्ये राज्यातील २९ जिल्ह्यातील २५३ तालुक्यांचे नुकसान झाल्याचं सांगण्यात आलं आहे. यामध्ये काही जिल्हे वगळले होते. मात्र, मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांनी आवाज उठवल्यांतर सरकारनं आज पुन्हा नवीन जीआर काढला आहे. यामध्ये सरकारनं राज्यातील ३४ जिल्ह्यातील ३४७ तालुक्यांचे नुकसान झाल्याचे सांगितले आहे. तसेच विद्यार्थ्यांच्या परीक्षा शुल्कात माफी आणि १० वी आणि १२ वी च्या विद्यार्थ्यांची फी माफी करण्याचा निर्णय सरकारनं या नवीन जीआरमध्ये घेतला आहे.

राज्यातील ३४ जिल्ह्यांमध्ये ३४७ तालुक्यातील शेती पिकांचे, शेतजमिनीचं मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. तसेच जनावरे दगावणे, मनुष्य हानी होणे, घराची पडझड होणे यासाठी सरकारनं मदतीचा नवीन जीआर जाहीर केला आहे. राज्य सरकारनं जाहीर केलेल्या जीआरमध्ये दिलेल्या माहितीनुसार, जून ते ऑगस्ट या तीन महिन्यात राज्यातीस २६.६९ लाख हेक्टर क्षेत्र आणि सप्टेंबरमध्ये ३९ लाख हेक्टर क्षेत्रावरील पिकांचे नुकसान झाले आहे. म्हणजे एकूण ६५ लाख हेक्टर क्षेत्रावरील पिकांचं नुकसान झालं आहे.

**नवीन जीआरनुसार नेमक्या काय मिळणार सवलती?**

१) जमिन महसुलात सूट, २) सहकारी कर्जाचे पुनर्गठन, ३) शेतीशी निगडीत कर्जाच्या वसुलीसाठी स्थगिती (एक वर्षासाठी), ४) तिमाही वीज बिलात माफ, ५)परीक्षा शुल्कात माफी व १० वी १२ वी च्या विद्यार्थ्यांची फी माफी आपातग्रस्त मृत व्यक्तीच्या वारसांना ४ लाख अर्थसाहाय्य मिळेल. ६0 टक्क्यांहून अधिक अपंगत्व आल्यास २.५0 लाख आणि जखमी व्यक्ती रुग्णालयात दाखल असल्यास ५,४00 ते रू १६,000 पर्यंत मदत मिळणार आहे.

पूर्णतः नष्ट झालेल्या घरांसाठी (पक्क्या/कच्च्या) सपाट भागात १.२0 लाख, तर डोंगराळ भागात १.३0 लाख आणि अंशतः पडझड झालेल्या घरांसाठी ६,५00 (पक्के) ते ४,000 (कच्चे) पर्यंत मदत दिली जाईल. झोपडीसाठी ८,000 आणि गोठ्यासाठी ठि ३,000 ची मदत मिळणार आहे.

जिरायत पिकांसाठी ८,५00 प्रति हेक्टर, बागायत पिकांसाठी १७,000 प्रति हेक्टर आणि बहुवार्षिक पिकांसाठी २२,५00 प्रति हेक्टर (जास्तीत जास्त ३ हेक्टरच्या मर्यादित) मदत मिळेल., नैसर्गिक आपत्तीमध्ये शेतजमिनीवरील गाळ काढण्यासाठी १८,000 प्रति हेक्टर, तर जमीन खरडून गेली असल्यास (केवळ अल्प व अत्यल्प भूधारक शेतकऱ्यांना) ४७,000 प्रति हेक्टर मदत जाहीर करण्यात आली आहे.

**बाधित झालेले ३४ जिल्हे पूढीलप्रमाणे =**

ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, नाशिक, धुळे, जळगाव, नंदुरबार, अहिल्यानगर, पुणे, सोलापूर, सांगली, सातारा, कोल्हापूर, छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड, लातूर, धाराशीव, नांदेड, परभणी, हिंगोली, बुलढाणा, अमरावती, अकोला, वाशिम, यवतमाळ, वर्धा, नागपूर, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर, गडचिरोली.

# विनापरवाना फटाका दुकाने नागरिकांच्या जीवितास धोका!

## महिला काँग्रेसचे जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदन; तत्काळ कारवाईची मागणी

**फटाके विक्रीत कायद्याचे उल्लंघन म्हणजे नागरिकांच्या जीवाशी थेट खेळ आहे. प्रशासनाचे दुर्लक्ष, व्यापाऱ्यांची बेफिकिरी आणि राजकीय अनास्था - या तिघांच्या संगनमतानेच शहरात असे बेकायदेशीर व्यवहार रुजतात. दिवाळीचा सण आनंदाचा असावा, भयाचा नव्हे. त्यामुळे जिल्हा प्रशासनाने तातडीने कारवाई करून नागरिकांचा विश्वास परत मिळवावा, हीच लोकशाहीची खरी जबाबदारी आहे.**

**जालना । प्रतिनिधी -** दिवाळी सणाचा उत्साह सर्वत्र सुरू असला, तरी या आनंदोत्सवातही निष्काळजीपणाचे सावट घोंघावत आहे. जालना शहरातील आझाद मैदान, पांजरपोळ परिसर आणि कल्याणराव घोगरे क्रीडा संकुल येथे विनापरवाना उभारण्यात आलेल्या फटाका दुकानांनी नागरिकांच्या सुरक्षेचा गंभीर प्रश्न निर्माण केला आहे. या पार्श्वभूमीवर महिला काँग्रेस कमिटीच्या जिल्हाध्यक्षा नंदाताई पवार यांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे निवेदन देत, या बेकायदेशीर दुकानांवर तातडीने कारवाई करण्याची मागणी केली आहे.

महिला काँग्रेसच्या निवेदनानुसार, सध्या शहरात उभारलेली अनेक फटाका दुकाने ही महानगरपालिका जालना आणि अग्निशमन विभागाचे ना हरकत प्रमाणपत्र न घेता सुरू आहेत. फटाके हा अत्यंत ज्वलनशील व स्फोटक पदार्थ असल्याने अशा दुकानांना Explosives Rules 2008 आणि Disaster Management Act 2005 अंतर्गत परवानगी घेणे बंधनकारक आहे. परंतु, संबंधित व्यावसायिकांनी हे सर्व नियम धाब्यावर बसवून थेट नागरिकांच्या जीवाशी खेळ सुरू केला आहे.

महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, फटाका असोसिएशनला अद्याप कोणतीही अधिकृत परवानगी दिलेली नाही, तरीही शहरात गेल्या आठ दिवसांपासून फटाका विक्री जोरात सुरू असल्याचे उघड झाले आहे.

नंदा पवार यांनी निवेदनात स्मरण करून दिले की, काही वर्षांपूर्वी लालबाग परिसरात फटाका दुकानांना लागलेल्या आगीमुळे मोठ्या प्रमाणावर जीवित आणि मालमत्तेचे नुकसान झाले होते. त्या घटनेनंतरही प्रशासनाने योग्य धडा न घेतल्याची खंत त्यांनी व्यक्त केली. फटाक्यांच्या दुकानांसाठी सुरक्षित अंतर, पुरेशी हवा खेळती राहील अशी जागा आणि अग्निशमनाची साधने असणे अनिवार्य आहे. मात्र सध्या शहरातील अनेक ठिकाणी हे नियम पूर्णपणे पाळले जात नाहीत, असे त्या म्हणाल्या.

महिला काँग्रेसने आपल्या निवेदनात नमूद केले आहे की, सचिन हिरालाल सोनी (कार्याध्यक्ष - जालना जिल्हा फटाका व्यावसायिकांची सेवाभावी संस्था) आणि गेंदालाल राजाराम झुंगे (अध्यक्ष - जय बजरंग फटाका असोसिएशन) यांच्या नावाने कार्यरत असलेल्या या असोसिएशनची कोणत्याही सरकारी विभागात नोंद नाही. तसेच, या ठिकाणी फटाक्यांचे सुरक्षित गोदाम किंवा अधिकृत परवाना नसल्याचेही उघड झाले आहे. या पार्श्वभूमीवर महिला काँग्रेसने प्रशासनाला बोगस असोसिएशनविरुद्ध गुन्हा दाखल करून दुकाने तात्काळ हटविण्याची मागणी केली आहे.

या निवेदनावर नंदा पवार (जिल्हाध्यक्षा, महिला काँग्रेस कमिटी जालना) यांच्यासह विनोद यादव, नारायण वाढेकर, गणेश चांदोडे आणि सुरज यलगंठवार यांच्या स्वाक्षऱ्या आहेत. निवेदनात म्हटले आहे की, सणाचा आनंद नागरिकांच्या सुरक्षिततेच्या किंमतीवर घेऊ नका. बेकायदेशीर दुकानांवर कारवाई करणे ही प्रशासनाची नैतिक आणि कायदेशीर जबाबदारी आहे.

**जिल्हा प्रशासनाची जबाबदारी**

सध्याच्या परिस्थितीत जिल्हाधिकारी, महानगरपालिका आयुक्त आणि अग्निशमन विभागाने समन्वय साधून - तत्काळ संयुक्त तपासणी मोहीम राबवावी, विनापरवाना फटाका दुकाने बंद करून जप्तीची कारवाई करावी, नागरिकांमध्ये फटाके वापरात सावधगिरी बाळगा हा जनजागृती संदेश **पान २ वर**



# सरन्यायाधीश भुषण गवई यांच्यावर हल्ल्याचा निषेध

## राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार गट) सामाजिक न्याय विभागाचे आंदोलन




**जालना । प्रतिनिधी -** भारताचे सरन्यायाधीश मा. भुषण गवई यांच्यावर दि. १५ ऑक्टोबर रोजी सर्वोच्च न्यायालयात झालेल्या हल्ल्याच्या प्रयत्नाचा तीव्र निषेध करत आज राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार गट) सामाजिक न्याय विभागाच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरना आंदोलन व निषेध करण्यात आला. निवेदन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना धरना आंदोलनादरम्यान आंदोलनकर्त्यांनी निवेदन केले.

सार्वजनिक आरोग्य मंत्री मा. राजेश टोपे तसेच राष्ट्रवादी काँग्रेस जालना जिल्हाध्यक्ष डॉ. निसार अहमद देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत निवेदन सादर केले.

या निवेदनात म्हटले आहे की, भारताचे सरन्यायाधीश मा. भुषण गवई साहेब यांच्यावर कोर्ट चालू असताना बूट फेकून मारण्याचा प्रयत्न हा गंभीर गुन्हा असून, तो केवळ व्यक्तीवर नव्हे तर भारताच्या लोकशाही व संविधानावर झालेला हल्ला आहे. हल्लेखोर राकेश किशोर याच्यावर देशद्रोह व अनुसूचित जाती-अनुसूचित जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यानुसार (ट्रासिटी कायदा) कठोर कारवाई करून त्याला कठोरातील कठोर शिक्षा द्यावी.

निवेदनात पुढे नमूद करण्यात आले की, हा प्रकार जुनाट धार्मिक विचारसरणी व संविधानविरोधी प्रवृत्तीचे द्योतक आहे. देशाच्या सर्वोच्च न्यायालयाचे मान राखण्यासाठी आणि लोकशाहीचा सन्मान राखण्यासाठी त्वरित न्यायिक आणि पोलिसीय कारवाई करणे आवश्यक असल्याची मागणीही या निवेदनात करण्यात आली आहे. या आंदोलनावेळी सुरेश खंडाळे (जिल्हाध्यक्ष, सामाजिक न्याय विभाग), **पान २ वर**

# पत्रकारांचे आंदोलन अन् प्रशासनाची दिशाभूल करत उपोषण मागे घेण्याची विनंती

## कारवाई होत नाही तोपर्यंत अन्नत्याग; उपोषणकर्त्यांचा ईशारा

**जालना । प्रतिनिधी -** गेल्या महिनाभरापासून महावितरणच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी पत्रकारांबद्दल केलेल्या वक्तव्यांवरून वादंग उठले असून प्रशासनाच्या दिरंगाई धोरणामुळे पत्रकारांना थेट अन्नत्याग उपोषणाला बसावे लागले आहे.




शहरातील मस्तगड येथील महावितरण या कार्यालयातील कर्मचारी अधिकारी गैरवर्तुणुकीमुळे तसेच पत्रकरांना दिलेल्या अपमानास्पद व बेजबाबदार वागणुकीमुळे त्यांच्या कारवाई करण्याबाबत १२ सप्टेंबर रोजी इंडियन जर्नलिस्ट असोसिएशनच्यावतीने जिल्हाध्यक्ष आमेर खान व सुनील भारती यांनी निवेदन दिले होते. त्यानंतर महावितरणच्या कार्यकारी अभियंता यांनी कारवाईचे आश्वासन दिले. मात्र, कोणतीही कारवाई न झाल्याने पुन्हा अन्नत्याग आंदोलनचा ईशारा संघटनेच्यावतीने देण्यात आला. त्यानंतरही महावितरणचे अभियंता गाढ झोपेत राहिले. उपोषणाचा ईशारा १० ऑक्टोबरचा असल्याने झोपेत असलेले अभियंता हे ९ ऑक्टोबर रोजी जागे झाले आणि त्यांनी संघटनेला दिशाभूल करणारे पत्र देत उपोषण करण्यापासून रोखण्याचा प्रयत्न केला. कार्यकारी अभियंत्याने दिलेल्या पत्रात म्हटले की, अशी कोणतीही घटना घडली नाही. पत्रकारांना अपशब्द वापरले नाहीत. **पान २ वर**

# गुटखा विक्रीवर शासनाची कडक बंदी; तरीही लाला साम्राज्याचा मृत्यूचा व्यापार सुरूच!

## निष्क्रिय पोलिस प्रशासनावर संतप्त नागरिकांची आता समाजसेवक, राजकारण्यांना आर्त हाक

**जालना । प्रतिनिधी -** राज्य शासनाने गुटखा विक्रीवर स्पष्ट व कडक बंदी लागू केली असतानाही, जालना जिल्ह्यात गुटखा माफिया सतीश उर्फ लाल रंगाचा राजा लाला याचे साम्राज्य खुलेआम फोफावत आहे. गुटख्याचा हा घातक व्यापार केवळ आरोग्याच्या दृष्टीनं नव्हे, तर कायद्याच्या अस्तित्वावरही प्रश्नचिन्ह निर्माण करणारा ठरत आहे. हप्ता दिला की कायदा झोपतो! असा नागरिकांचा थेट आरोप आहे. गुटखा विक्रीविरोधात शासनाचे आदेश, आरोग्य विभागाच्या सूचना आणि पोलिस विभागाच्या मोहीमा कागदावरच आहेत. प्रत्यक्षात मात्र सतिश उर्फ लाला च्या माध्यमातून शाळा-कॉलेज परिसर, चौक, बसस्थानकं आणि बाजारपेठा यामध्ये गुटख्याचा व्यापार वाढत चालला आहे. तरुणाई आणि विद्यार्थी वर्ग या विषारी सवयीच्या जाळ्यात अडकत आहेत. पोलीस प्रशासन निष्क्रिय झाले असून आता सामाजिक कार्यकर्ते आणि राजकारण्यांनी याकडे गांभीर्याने लक्ष द्यावे अशी मागणी सूज्ञ नागरिकांमधून केली जात आहे. मोठ्या माफियाला हात लावायचा नाही.

हप्ता दिला की कायदा झोपतो! हे दृश्य जालना जिल्ह्याच्या कायद्याच्या पाया हादरवत आहे. गुटखा विक्री खुलेआम सुरू असताना, पोलिसांकडून फक्त नजर ठेवत आहोत अशी औपचारिक प्रतिक्रिया दिली जाते. परंतु प्रत्यक्षात महत्वाच्या चौकांवर, पानटपऱ्यांवर आणि सार्वजनिक ठिकाणी गुटख्याचा व्यापार दिवसाढवळ्या सुरू आहे. यावरून स्पष्ट होते की, पोलिसांची भूमिका कारवाईपेक्षा संरक्षण देणारी झाली आहे, आणि नागरिकांचा कायद्यावरील विश्वास हळूहळू संपत चालला आहे.

पोलिस प्रशासनाच्या निष्क्रियतेमुळे आता नागरिकांनी सामाजिक कार्यकर्ते व राजकारण्यांना आर्त हाक दिली आहे. पोलीस प्रशासनासह जिल्हा प्रशासनाला जाग्यावर आणा आणि सतिष उर्फ लाला यांच्या गुटख्याच्या साम्राज्याचा नाश करा त्यासाठी प्रशासनावर दबाव आणून या सामाजिक कार्यकर्ते व राजकारण्यांनी आता गुटखा माफियांच्या आर्थिक मुळांवर प्रहार करण्यासाठी विशेष तपास पथक नेमावे, शाळा-कॉलेज परिसरात ‘शून्य सहनशीलता धोरण’ लागू करावे, संबंधित पोलिस अधिकारी व कर्मचारी यांची चौकशी करून जबाबदारी निश्चित करावी, गुटखा विक्री आढळल्यास तत्काळ अटक व जप्तीची कारवाई करावी.

गुटखा बंदी असतानाही लाल रंगाचा राजा लाला आणि त्याचे जाळे अखंडपणे चालू आहे. प्रश्न केवळ एका माफियाचा नाही, तर कायद्याच्या अंमलबजावणीतील भ्रष्ट साखळीचा आहे. राज्य सरकारने याकडे गांभीर्याने पाहून स्पेशल टास्क फोर्समार्फत कारवाई केली नाही, तर जालना जिल्हा गुटखा राजधानी म्हणून ओळखला जाईल.

गुटखा विक्री हा आरोग्याचा नव्हे तर लोकशाहीवरील हल्ला आहे. पोलिसांनी जर लोकांच्या अपेक्षेप्रमाणे कायद्याची अंमलबजावणी **पान २ वर**

# संपादकीय

## महानायक...

हिंदी चित्रपटसृष्टीचा शहेनशहा, महानायक अमिताभ बच्चन यांचा वाढदिवस. ११ ऑक्टोबर १९४२ रोजी उत्तरप्रदेशातील अलाहाबाद येथे जन्मलेल्या अमिताभ यांच्या वडिलांचे ( हरिवंशराय बच्चन ) मूळ आडनाव श्रीवास्तव असले तरी ते बच्चन या टोपणनावाने कविता प्रसिद्ध करीत त्यामुळे अमिताभ यांनीही चित्रपट सृष्टीत आल्यावर बच्चन हेच टोपणनाव आडनाव म्हणून वापरण्यास सुरवात केली. पुढे संपूर्ण कुटुंबाचेच बच्चन हेच आडनाव व्यवहारात रूढ झाले. अमिताभ बच्चन यांचे शालेय शिक्षण अलाहाबाद येथील ज्ञानप्रबोधिनी आणि बॉईज हायस्कूल येथे झाले. दिल्लीच्या किरोडीमल महाविद्यालयातून त्यांनी विज्ञानाची पदवी घेतली त्यानंतर काहीकाळ त्यांनी कोलकाता येथे एका कंपनीत काम केले पण तिथे त्यांचे मन रमले नाही तेथून ते मुंबईत आले आणि चित्रपटात कामाच्या संधी शोधू लागले. अमिताभ बच्चन यांना ख्वाजा अहमद अब्बास यांच्या सात हिंदुस्थानी या चित्रपटात संधी मिळाली. दुर्दैवाने हा चित्रपट चालला नाही. अमिताभ यांचाही म्हणावा तसा प्रभाव पडला नाही. अमिताभ बच्चन यांनी हिंदी चित्रपट सृष्टीत पदार्पण केले तेंव्हा देव आनंद, शम्मी कपूर, राजेश खन्ना, विनोद खन्ना, जितेंद्र, धर्मेंद्र, शशी कपूर अशा देखण्या नायकाची चलती होती. अशा काळात अमिताभ तग धरतील का ? अशी साशंकता होती त्यात त्यांच्या पहिलाच चित्रपट जोरदार आपटला मात्र त्यांनी हार मानली नाही. सलग सात चित्रपट आपटूनही ते डगमगले नाही. १९७३ साली आलेल्या प्रकाश मेहरा दिग्दर्शित जंजीर या चित्रपटाने अमिताभ यांना खरा ब्रेक मिळवून दिला. या चित्रपटातील पोलीस इन्स्पेक्टरची त्यांची भूमिका खूप गाजली. या चित्रपटानंतर त्यांची अँग्री यंग मॅन अशी जनमानसात प्रतिमा निर्माण झाली. प्रचलित समाजव्यवस्थेच्या विरोधात बंडखोरी व क्रोध व्यक्त करणाऱ्या युवकांचे प्रतिनिधित्व त्यांनी पडद्यावर साकारले त्यामुळेच त्यांच्या भूमिका प्रेक्षकांना आपल्याशा वाटल्या. उंच शरीरयष्टी, भेदक डोळे, भारदस्त आवाज आणि अनोखी अभिनय शैली यामुळे त्यांनी प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवले. ते लवकरच सुपरस्टार पदावर पोहचले. दिग्दर्शक ऋषिकेश मुखर्जी यांच्या आनंद चित्रपटात त्यांना सुपरस्टार राजेश खन्ना यांच्यासमवेत काम करण्याची संधी मिळाली. या संधीचे त्यांनी सोने केले. त्यावर्षीचा सर्वोत्कृष्ट सहाय्यक अभिनेत्याचा फिल्मफेअर पुरस्कार त्यांना मिळाला. नमक हराम या चित्रपटातील त्यांची भूमिकाही लक्षवेधी ठरली. ७० आणि ८० चे दशक अमिताभ बच्चन यांनी अक्षरशः गाजवून सोडले. दिवार, शोले, अभिमान, कभी कभी, अमर अकबर अँथनी , मुक़द्दर का सिकंदर, त्रिशूल, डॉन, काला पथर, नशीब, लावरीस, सिलसिला, नमक हलाल, कुली, शराबी, खुद्दार, अग्निपथ असे एकापेक्षा एक सुपरहिट चित्रपट त्यांनी दिले. अमिताभ बच्चन यांच्या इतकी लोकप्रियता आजतागायत कोणत्याही अभिनेत्याला लाभलेली नाही. अमिताभ बच्चन हे त्यांच्या काळातील सर्वाधिक मानधन घेणारे अभिनेते होते. त्यांनी आजवर २०० हुन अधिक चित्रपटात भूमिका केल्या. त्यांनी काही चित्रपटात पार्श्वगायनही केले. मिस्टर नटवरलाल चित्रपटातील पार्श्वगायनासाठी त्यांना फिल्मफेअरचा पुरस्कारही मिळाला होता. १९८४ साली त्यांनी राजकारणात प्रवेश केला मात्र हा आपला प्रांत नाही हे लक्षात येताच त्यांनी राजकारणाला रामराम केला. १९८२ साली कुली चित्रपटाच्या शूटिंगच्या वेळी अपघात होऊनही करोडो चाहत्यांच्या आशीर्वादाने अमिताभ पुन्हा एकदा उभे राहिले. १९९६ साली अमिताभ बच्चन कॉर्पोरेशन लिमिटेड ही कंपनी त्यांनी स्थापन केली. मात्र लवकरच त्यांना ती बंद करावी लागली या दरम्यान त्यांना मोठे आर्थिक नुकसान सहन करावे लागले. हे आर्थिक नुकसान भरून काढण्यासाठी त्यांनी दूरचित्रवाणीवरील कौन बनेगा करोडपती या मालिकेचे सूत्रसंचालन करण्यास सुरुवात केली. कौन बनेगा करोडपती ही प्रश्नमंजुषा देखील त्यानी यशस्वी केली. आज ते वयाची ८३ वर्ष पूर्ण करत असले तरी तरुणांना लाजवेल असा त्यांचा उत्साह आहे. अमिताभ बच्चन यांच्यासारखा प्रतिभावान कलाकार युगातून एकदाच जन्माला येतो. त्यांच्यासारखा अभिनेता भारतातच नव्हे तर जगात झाला नाही आणि पुढे देखील होणार नाही. अमिताभ बच्चन यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देतानाच त्यांना दीर्घायुष्य लाभो अशी ईश्वर चरणी प्रार्थना करतो. अमिताभ बच्चन यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

## पोलिसांचा फिटनेस फंडा !

# सायकलिंग आणि ट्रेकिंगच्या माध्यमातून उपविभागीय पोलीस अधिकारी रामेश्वर रेंगे यांनी जपला साहसाचा छंद; महाराष्ट्रातील सर्वात कठीण एएमके ट्रेक १४ तासांत पूर्ण

**परतूर । प्रतिनिधी** - बंदोबस्त, गुन्हे आणि कायदा-सुव्यवस्थेच्या कामात व्यस्त असतानाही आपले शारीरिक आणि मानसिक आरोग्य कसे जपावे, याचा आदर्श वस्तुपाठ उपविभागीय पोलीस अधिकारी रामेश्वर रेंगे यांनी घालून दिला आहे. रेंगे यांनी सायकलिंग आणि ट्रेकिंगच्या साहसी छंदांला कुटुंबाची साथ मिळाल्याने फिटनेसची एक नवी ओळख निर्माण केली आहे.

कोरोना काळात परतूरचे डीवायएसपी रामेश्वर रेंगे यांनी सायकलिंगला सुरुवात केली. विशेष म्हणजे, त्यांच्या या छंदाला त्यांचा मुलगा अभिजीत आणि मुलगी अदिती यांनीही साथ दिली. ते रोज साधारणपणे ३० ते ५० किलोमीटर सायकलिंग करतात, तसेच अनेकदा एकाच वेळी १०० किलोमीटर सायकलिंगचा टप्पाही सहज पार करतात. यामुळे त्यांच्या कुटुंबात फिटनेसची एक आरोग्यदायी सवय लागली आहे.

सह्याद्रीतील सर्वात अवघड ट्रेक्सवर 'रेंगे' यांचा विजय सायकलिंगसोबतच रेंगे यांना ट्रेकिंगची प्रचंड आवड आहे. महाराष्ट्रातील सह्याद्रीच्या डोंगररांगांमध्ये अनेक कठीण आणि ऐतिहासिक किल्ले त्यांनी सर केले आहेत. महाराष्ट्रातील सर्वोच्च शिखर असलेल्या कळसुबाईवर त्यांनी आतापर्यंत तब्बल दहा वेळा चढाई केली आहे.

ऐतिहासिक किल्ले रतनगड आणि हरिहर गड प्रत्येकी चार वेळा तसेच राजगड, हरिश्चंद्र गड, शिवनेरी किल्ला त्यांनी यशस्वीरीत्या पूर्ण केले आहेत. पुण्याच्या परिसरातील सर्वात कठीण मानला जाणारा कात्रज बोगदा ते सिंहगड नाईट ट्रेक त्यांनी पूर्ण केला, ज्यात सलग सतरा डोंगरांचा चढ-उतार असतो.

**एएमकेचा थरार १४ तासांत पूर्ण**

रामेश्वर रेंगे यांच्या ट्रेकिंगमधील सर्वात मोठी आणि रोमांचक कामगिरी म्हणजे अलंग, मदन, कुलंग या दुर्ग त्रिकुटाचा ट्रेक. सह्याद्रीतील अत्यंत कठीण आणि एका दिवसात पूर्ण करणे जवळपास अशक्य मानला जाणारा एएमकेचा थरार ट्रेक त्यांनी केवळ १४ तासात पूर्ण केला. या ट्रेकमध्ये रॅपलिंग आणि क्लाइंबिंग यांसारखी आवश्यक कौशल्ये वापरून त्यांनी स्वतःची शारीरिक आणि मानसिक क्षमता सिद्ध केली आहे. महाराष्ट्रातील आव्हानं पार केल्यानंतर त्यांनी आंतरराष्ट्रीय स्तरावरही आपला साहसी प्रवास सुरू ठेवला. नोव्हेंबर २०२३ मध्ये त्यांनी नेपाळमधील जगातील सर्वोच्च शिखर असलेल्या माउंट एव्हरेस्टचा बेस कॅम्प यशस्वीरित्या पूर्ण केला. त्यानंतर डिसेंबर २०२४ मध्ये त्यांनी उत्तराखंडमधील निसर्गरम्य आणि आव्हानात्मक केदारकंठा ट्रेक पूर्ण केला आहे.

उपविभागीय पोलीस अधिकारी रामेश्वर रेंगे यांची ही कामगिरी केवळ एक छंद नसून, आपल्या व्यस्त जीवनातही शारीरिक क्षमता आणि मानसिक कणखरता कशी जपायची, याचा एक प्रेरणादायी संदेश आहे. पोलीस दलातील कर्तव्ये आणि साहसी छंदांचा योग्य समन्वय साधून त्यांनी एक नवा आदर्श निर्माण केला आहे.



पान १ वरुन

## सरन्यायाधीश ...

नंदकिशोर जागंडे (शहराध्यक्ष), तय्यब बापू देशमुख (शहर उपाध्यक्ष), बंडू डोईफोडे, तेजराव शिंदे, गणेश कदम, प्रकाश राऊत, सचिन गंगावणे, राजेश पंडित, रावसाहेब दाभाडे, रोहिदार वाहुळे, प्रदीप मघाडे, गणेश घाडगे आदी पदाधिकारी उपस्थित होते. या आंदोलनातून राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी न्यायव्यवस्थेच्या स्वातंत्र्याबद्दल जागरूकता दाखवली असून, लोकशाहीवरील हल्ला सहन केला जाणार नाही असा स्पष्ट संदेश दिला.

## विना परवाना ...

पोहोचवावा.

फटाके हे सणाचा भाग असले तरी, त्यांचा बेजबाबदार वापर आनंदाचा उत्सव शोकांतिकेत बदलू शकतो. महिला काँग्रेसचे निवेदन हे केवळ राजकीय हालचाल नसून, एक सामाजिक आणि सुरक्षा विषयक इशारा आहे. प्रशासनाने वेळ न दवडता कारवाई केली नाही, तर जालना शहरात कोणत्याही क्षणी लालबागसारखी दुर्घटना घडू शकते - आणि त्याची जबाबदारी मग कोण घेणार? फटाक्यांचा वापर हा फक्त आवाज आणि प्रकाशापुरता मर्यादित नाही. त्याचे दुष्परिणाम दूरगामी आणि धोकादायक आहेत, फटाक्यांमधून निर्माण होणारा धूर, सल्फर डायऑक्साइड आणि नायट्रेट्स हवेत मिसळून प्रदूषणाचे प्रमाण प्रचंड वाढवतात. यामुळे श्वसनाचे आजार, दमा आणि ॲलर्जीची समस्या वाढते. मोठ्या आवाजामुळे पाल्य प्राणी, रस्त्यावरील कुत्री, तसेच पक्षी घाबरून जखमी होतात किंवा मृत्युमुखी पडतात. स्फोटक आवाजांमुळे बालक आणि ज्येष्ठ नागरिकांना मानसिक ताण, रक्तदाब वाढ आणि हृदयविकाराचा धोका निर्माण होतो. परवानगीशिवाय उभारलेली दुकाने जर गर्दीच्या भागात असतील, तर अग्नितांडवाची शक्यता अत्यंत जास्त आहे. फटाक्यांपासून ठिणगी, उष्णता किंवा घर्षणामुळेही स्फोट होऊ शकतो.

## पत्रकारांचे आंदोलन ...

तरीदेखील कर्मचाऱ्याच्या सेवा पुस्तीकेवर नोंद घेत कारवाई करण्यात आली आहे. आता प्रश्न असा निर्माण होतो की, अभियंत्यांने सांगितल्या प्रमाणे जर घटना घडलीच नाही तर कर्मचाऱ्याच्या सेवा पुस्तीकेवर काय? नोंद करण्यात आली आणि काय कारवाई झाली. याची पुष्टी होत नाही. त्यामुळे संघटनेच्यावतीने १० ऑक्टोबर रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर अन्नत्याग उपोषण सुरु झाले आहे. जिल्हा प्रशासनानेही सोपास्कार पूर्ण करत महावितरणने ९ ऑक्टोबर रोजी दिलेल्या पत्राचा उल्लेख करत उपोषण मागे घेण्याची विनंती केली आहे. मात्र, जोपर्यंत त्या महाविरतणच्या अधिकारी - कर्मचाऱ्यांवर कारवाई होत नाही तो पर्यंत अन्नत्याग उपोषण मागे घेणार नसल्याचा पावित्रा उपोषणकर्ते आमिर खान, सुनील भारती यांनी घेतला आहे.

महावितरणसारख्या सार्वजनिक संस्थेतील अधिकारी जर पत्रकारांशी अशाप्रकारे वागत असतील, आणि प्रशासन त्यांच्यावर कारवाई न करता फक्त निवेदनांची देवाणघेवाण करत असेल, तर ही लोकशाहीसाठी धोक्याची घंटा आहे. पत्रकार हा समाजाचा पहारा देणारा डोळा आहे. या डोळ्यावरच दबाव आणण्याचा प्रयत्न म्हणजे सत्य लपवण्याचा प्रयत्न होय. जिल्हा प्रशासनाने तत्काळ स्वतंत्र चौकशी समिती नेमावी., महावितरणच्या अधिकाऱ्यांची सेवा नोंद व सर्व पत्रव्यवहार सार्वजनिक करावा., पत्रकार सुरक्षेसाठी स्थायी समिती स्थापावी.

## गुटखा विक्रीवर ..

केली नाही, तर नागरिकांचा विश्वास हरवेल आणि समाजात हप्त्याच्या कायद्याचा नियम लागू होईल. राज्य सरकारने तातडीने हस्तक्षेप करून लाल रंगाचा राजा आणि त्याच्या संरक्षण कवचावर घाव घालावा, नाहीतर कायदा केवळ कागदावर उरेल.

**गुटखा म्हणजे मृत्यूचा व्यापार**

गुटखा हा केवळ तंबाखूजन्य पदार्थ नाही, तर 'मृत्यूचे बीज' आहे. मुखाचा कर्करोग, पचनाचे विकार, दात व हाडांचे आजार - ही केवळ वैद्यकीय संकटे नाहीत, तर सामाजिक आपत्ती आहे. प्रत्येक गुटखा पाउच म्हणजे एका कुटुंबाच्या उद्ध्वस्त होण्याची सुरुवात. या घातक सवयीमुळे तरुण पिढीचा मानसिक व शारीरिक ऱ्हास होत आहे, तर आरोग्य व्यवस्थेवर प्रचंड ताण निर्माण होत आहे.



# कृषि समृद्धी योजना

(शेतकऱ्यांच्या प्रगतीसाठी शासनाची महत्वाकांक्षी योजना)
कृषि समृध्दी योजना अंतर्गत

## यंत्र/अवजारे अनुदान मर्यादा

| यंत्र व अवजाराचा प्रकार | अनुदान मर्यादा | |
|---|---|---|
| | इतर भूधारक शेतकऱ्यांसाठी ४०% | अनुसूचित जाती / जमाती / महिला / अल्प व अत्यल्प भूधारक शेतकऱ्यांसाठी ५० % |
| | मंजूर कमाल अनुदान मर्यादा प्रतियंत्र | मंजूर कमाल अनुदान मर्यादा प्रतियंत्र |
| ट्रॅक्टर | १ लाख | १.२५ लाख |
| रोटाव्हेटर | ४८ ते ७६ हजार | ६० ते ९५ हजार |
| पॉवर टिलर | ७० हजार | ८५ हजार |
| पॉवर विडर | २४ ते ६८ हजार | ३० ते ८५ हजार |
| स्वयंचलित भात लावणी यंत्र | १ लाख ३६ हजार | १ लाख ७० हजार |
| भात लावणी (मनुष्य चलित) | ८ हजार | १० हजार |
| भात कापणी यंत्र | २४ ते ६० हजार | ३० ते ७५ हजार |
| भात मळणी यंत्र | ३० ते १.१२ हजार | ३८ ते १.४० हजार |
| भात मळणी यंत्र (मनुष्य चलित) | ८ हजार | १० हजार |
| ब्रश कटर | १६ ते ३५ हजार | २० ते ४४ हजार |
| प्लॅस्टिक मल्चिंग मशिन | १८ ते ४० हजार | २३ ते ५० हजार |
| सुपारी काढणी यंत्र | २४ हजार | ३० हजार |
| फलोत्पादन यंत्र कापणी/छाटणी इ. | २८ हजार | ३५ हजार |
| चेन सॉ | ३६ हजार | ४५ हजार |
| मिनी राईस मिल | १ लाख ते १ लाख ९२ हजार | १ लाख ५० ते २ लाख ४० |
| पॉवर स्प्रेअर १६ लि. चे आत | २४०० ते ३२०० | ३००० ते ४००० |
| पॉवर स्प्रेअर १६ लि. चे वर | ८ हजार | १० हजार |
| कृषि औजारे बँक स्थापना (CHC)- | प्रकल्प खर्च (रु.१० लाख ते रु. २५० लाख) च्या ४०% किंवा रु. ४ लाख ते रु. १ कोटी या पेक्षा जे कमी असेल ते | |

## सिंचन सुविधा या बाबीमधून

| तपशिल | अनुदान मर्यादा | | |
|---|---|---|---|
| ठिबक व तुषार सिंचन (२० गुंठे ते ५ हे. पर्यंत लाभ घेता येईल) पुरक अनुदान (मुख्यमंत्री शाश्वत कृषी सिंचन योजना ) | लहान व सिमांत शेतकरी ५५% +२५% | इतर शेतकरी ४५% +३०% | अनुसुचित जाती व जमाती ९०% |

### सिंचन सुविधा या बाबीमधून

इलेक्ट्रीक मोटर पंप, डिझेल/पेट्रोल इंजिन, शेततळे, पाईप संच पुरवठा, ठिबक सिंचन व तुषार सिंचन करिता अनुदान

### फलोत्पादन या बाबीमधून

हरितगृह, शेडनेट, मल्चींग पेपर, वीडमॅट, पॅक हाऊस, फळ प्रक्रिया केंद्र, आंबा पुनरुज्जीवन, रोपवाटिका उभारणी व औषधी, मसाला, फुलशेती क्षेत्रविस्तार या करता शेतकऱ्यांना अनुदान देण्यात येणार

### यांत्रिकीकरण या बाबीमधून

ट्रॅक्टर, पॉवर टिलर, पॉवर विडर, ब्रश कटर, फवारणी पंप, भात कापणी यंत्र, कडबा कुट्टी, श्रेडर, वुड चीपर, सुपारी काढणी यंत्र इत्यादी यंत्र अवजारांना ४० % व ५० % अनुदान

**प्रथम अर्ज प्रथम प्राधान्य या तत्वानुसार निवड होणार असून त्याकरिता**

https://mahadbt.maharashtra.gov.in/Farmer/AgriLogin/AgriLogin

महाडीबीटी पोर्टलवर सीएससी सेंटरव्दारे अर्ज करावेत असे आवाहन कृषि विभागामार्फत करण्यात येत आहे.

अर्ज करण्याकरिता ॲग्रीस्टॅक फार्मर आयडी असणे आवश्यक आहे.

अधिक माहितीसाठी तालुका कृषि अधिकारी व गावातील सहाय्यक कृषि अधिकारी यांचेशी संपर्क



## फलोत्पादन अनुदान मर्यादा

| लागवड साहित्याची निर्मिती (संख्या) | अनुदान मर्यादा |
|---|---|
| अ) उच्च तंत्रज्ञान आधारित लहान रोपवाटीका स्थापन करणे -०.४० ते १ हे. | सार्वजनिक क्षेत्र-१००%,खाजगी क्षेत्र-५०% रु. १०.०० लाख / हेक्टर |
| ब) उच्च तंत्रज्ञान आधारित मोठी रोपवाटीका स्थापन करणे - १ ते २ हे. | सार्वजनिक क्षेत्र-१००%,खाजगी क्षेत्र-४०% रु. १२.०० लाख / हेक्टर |
| जुन्या फळबागांचे पुनरुज्जीवन (हे.) | |
| आंबा | रु.०.२४ लाख/हेक्टर ४०% |
| सामुहिक शेततळे (संख्या) | |
| ३४मी.x३४मी.x४.७मी.(५०००घ.मी.) | रु. ३.०० लाख (सर्वसाधारण क्षेत्र) ७५% |
| शेततळे अस्तरीकरण | खर्चाच्या ५०%,जास्तीत जास्त रु.०.७५ लाख |
| नियंत्रित शेती (हे./संख्या) | |
| हरितगृह (हे.) | रु.३.०० लाख ते रु.१२.५० लाख (५०%) क्षेत्र-५ ते २५ गुंठे पर्यंत) |
| शेडनेट हाऊस (हे.) | रु.१.७७ लाख ते रु.८.८७ लाख (५०%) क्षेत्र-५ गुंठे ते २५ गुंठे पर्यंत) |
| प्लॅस्टिक मल्चिंग (हे.) | खर्च मापदंडाच्या ५० % किंवा जास्तीत जास्त रु.०.२० लाख |
| मधुमक्षिका पालन (संख्या) | |
| मधुमक्षिका वसाहत संच वाटप | रु.१६००/- युनिट (५० संच/लाभार्थी) ४०% |
| मधुमक्षिका पेटी | रु.८००/-पेटी (५० पेटी/लाभार्थी) ४०% |
| मध काढणी यंत्र | रु.८०००/-सेट (१ सेट/लाभार्थी) ४०% |
| काढणीपश्चात व्यवस्थापन (संख्या) | |
| १) फार्म गेट पॅक हाऊस | ५०% किंवा रु. १२.५० लाख (अधिकतम) |
| २) एकात्मिक पॅक हाऊस | ३५ % किंवा रु. ५६ लाख (अधिकतम) |
| ३) पूर्व शितकरण गृह | ३५ % किंवा रु. १०.५० लाख (अधिकतम) |
| ४) शितखोली | ३५ % किंवा रु. १८.२० लाख (अधिकतम) |
| ५) शितगृह | ३५ % किंवा रु. १७.५० लाख (अधिकतम) |
| ६) शितवाहन | ३५ % किंवा रु. १०.८५ लाख (अधिकतम) |
| ७) रायपनिंग चेंबर | ३५ % किंवा रु. ०.४२ लाख (अधिकतम) |
| ८) प्राथमिक प्रक्रिया केंद्र | ३५ % किंवा रु. १२.२५ लाख (अधिकतम) |

- स्व. भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजना-१० गुंठे ते १० हे. पर्यंत लाभ घेता येईल.
- मुख्यमंत्री कृषि व अन्न प्रक्रिया योजना - अनुदान ३०% किंवा अधिकतम रु ५० लाख

'शेतकऱ्यांचा डिजिटल मित्र'

महाडीबीटी पोर्टलवर अर्ज | कृषि विभागाचे महाविस्तार AI ॲप


# दीपसन रेमेडी




- वृत्तपत्रे (दैनिक, साप्ताहिक) पेज सेटींग
- वेब पोर्टल, युट्युब चॅनल
- वृत्तपत्रांचे वार्षिक विवरण
- नविन शिर्षक (वृत्तपत्र) नोंदणी ऑनलाईन अर्ज
- वृत्तपत्रांशी निगडीत सर्व प्रश्नांचे अल्पदरात उपाय

**वृत्तपत्र, वेब पोर्टल नोंदणी संदर्भात संपूर्ण मार्गदर्शन**
**अधिस्विकृती पत्रिकेसंदर्भात संपूर्ण मार्गदर्शन**
**वृत्तपत्र शासनमान्य यादीत समाविष्ट करण्यासाठी मार्गदर्शन**

9975387225 | 8390098886




## महाराष्ट्र शासनाचे शेतकरी हितासाठी ऐतिहासिक मदत पॅकेज;

# जालना जिल्ह्यातील शेतकऱ्यांसाठी मोठा दिलासा - आमदार बबनराव लोणीकर

**जालना । प्रतिनिधी -** महाराष्ट्रातील शेतकरी गेल्या काही महिन्यांपासून अतिवृष्टी, ओला दुष्काळ आणि पूर यांसारख्या नैसर्गिक आपत्तींनी त्रस्त आहेत. जून ते सप्टेंबर २०२५ या कालावधीत झालेल्या मुसळधार पावसामुळे शेतीचे प्रचंड नुकसान, शेतजमिनींचे खरडणे, पशुधनाचे नुकसान आणि घरांचे उद्ध्वस्त होणे यांसारख्या संकटांना शेतकऱ्यांना सामोरे जावे लागले आहे. या पार्श्वभूमीवर, महाराष्ट्र शासनाने शेतकऱ्यांना तातडीचा आर्थिक आधार आणि पुनर्वसनासाठी ३१,६२८ कोटी रुपयांचे ऐतिहासिक मदत पॅकेज जाहीर केले आहे. ही घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील सरकारने आज, दि. ९ ऑक्टोबर २०२५ रोजी केली असून, याला राज्यभरातील शेतकरी आणि नेत्यांनी स्वागत केले आहे. विशेषतः जालना जिल्ह्यासारख्या अतिवृष्टीग्रस्त भागांसाठी हे पॅकेज एक जीवनदायिनी ठरत असून, येथील सर्व ८ तालुके (अंबड, जालना, घनसावंगी, बदनापूर, परतूर, मंठा, भोकरदन, जाफ्राबाद) या आपत्तीने प्रभावित झाल्याने या पॅकेजमुळे शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे.

या पॅकेजची घोषणा महसूल व वन विभागाने जारी केलेल्या शासकीय निर्णयानुसार (क्रमांकः सीएलएस-२०२५/प्र.क्र.३६५/म-३) करण्यात आली असून, त्यात राज्यातील २५३ तालुक्यांमध्ये लागू असलेल्या विविध मदतींचा समावेश आहे. या पॅकेजमध्ये शेतीच्या प्रकारानुसार, पशुधन नुकसानीसाठी, घर बांधकामासाठी आणि पायाभूत सुविधांसाठी स्वतंत्र तरतुदी करण्यात आल्या आहेत. शेती नुकसान भरपाईत कोरडवाहू शेतीसाठी प्रति हेक्टर १८,५०० रुपये, हंगामी बागायती शेतीसाठी २७,००० रुपये आणि कायम बागायती शेतीसाठी ३२,५०० रुपये देण्याची तरतूद आहे. तसेच, विमाधारक शेतकऱ्यांसाठी अतिरिक्त मदत म्हणून प्रति हेक्टर १७,००० रुपये (कमाल ३ हेक्टर) आणि रब्बी हंगामासाठी बियाणे-खते खरेदी साहाय्यासाठी सर्वसाधारण शेतीसाठी प्रति हेक्टर १०,००० रुपये (कमाल ३ हेक्टर म्हणजे ३०,००० रुपये) जाहीर करण्यात आले आहे. शेतजमिनीवरील गाळ काढण्यासाठी प्रति हेक्टर १८,००० रुपये आणि जमीन खरडणे किंवा वाहून जाण्यासाठी अल्प/अत्यल्प भूधारकांना प्रति हेक्टर ४७,००० रुपये देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. पायाभूत सुविधा पुनर्बांधणीसाठी १०,००० कोटी रुपयांचे स्वतंत्र पॅकेज जाहीर करण्यात आले असून, त्यात ग्राम विकास, जलसंपदा आणि ऊर्जा यांचा समावेश आहे.

पशुधन आणि घर नुकसानीसाठीही मोठी मदत जाहीर करण्यात आली आहे. मृत पशुधनासाठी दुधाळ जनावरांसाठी ३७,५०० रुपये, ओढकाम जनावरांसाठी ३२,००० रुपये आणि लहान जनावरांसाठी २०,००० रुपये प्रति जनावर देण्याचा विचार आहे. पूर्ण पडझड झालेल्या घरांसाठी सपाट भागात १.२० लाख रुपये आणि डोंगराळ भागात १.३० लाख रुपये देण्याची तरतूद आहे, तर अंशतः पडझड झालेल्या पक्क्या घरांसाठी ६,५०० रुपये आणि कच्च्या घरांसाठी ४,००० रुपये देण्यात येणार आहेत. तसेच, जमीन महसूलात सूट, सहकारी कर्जाचे पुनर्गठन, वीज बिल माफी, परीक्षा शुल्क आणि शैक्षणिक फी माफी यांसारख्या सवलतींचा समावेश या पॅकेजमध्ये आहे. मनरेगा अंतर्गत शेतजमीन दुरुस्तीसाठी प्रति हेक्टर ३ लाख रुपये (कमाल २ हेक्टर) आणि खचलेल्या किंवा बुजलेल्या साखळी दुरुस्तीसाठी कमाल ३०,००० रुपये देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. मृत व्यक्तींच्या कुटुंबांना ४ लाख रुपये आर्थिक सहाय्य देण्याची तरतूदही या पॅकेजमध्ये आहे.

जालना जिल्ह्यातील शेतकरी गेल्या काही महिन्यांत अतिवृष्टीमुळे सोयाबीन, कापूस आणि धान यांसारख्या पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. शेतजमिनी खरडून गेल्याने आणि पशुधनाचे नुकसान झाल्याने शेतकरी आर्थिक आणि मानसिक संकटात सापडले होते. या पार्श्वभूमीवर, परतूरचे आमदार बबनराव लोणीकर यांनी या पॅकेजला गेल्या ७० वर्षांतील सर्वात मोठी आणि ऐतिहासिक मदत असे संबोधले आहे. ते म्हणाले, ही केवळ आर्थिक मदत नाही, तर शेतकऱ्यांचा आत्मविश्वास वाढवणारी आणि त्यांच्या चेहऱ्यावर आशेचा किरण आणणारी आहे. जालना जिल्ह्यासाठी हे पॅकेज शेती पुनरुज्जीवनाचे नवीन दालन उघडणार आहे. जालना जिल्ह्यातील नुकसान मूल्यमापन १० ऑक्टोबर ते ३१ ऑक्टोबर २०२५ दरम्यान तालुका स्तरावर होणार असून, शेतकऱ्यांनी तहसील कार्यालय किंवा mahadbt.maharashtra.gov.in वर ऑनलाइन अर्ज सादर करावेत. अर्ज सादर करण्याची शेवटची तारीख ३० नोव्हेंबर २०२५ आहे, तर मदत वाटप डिसेंबर २०२५ पासून थेट बँक खात्यात (DBT) जमा होईल. सीळडीरलज्ञ मध्ये नोंद असलेल्या शेतकऱ्यांना e-KYC प्रक्रियेतून सूट देण्यात आली असून, तालुका आणि गाव पातळीवर



लाभार्थ्यांची यादी प्रसिद्ध करण्याचे बंधन घालण्यात आले आहे.

या पॅकेजची अंमलबजावणी पारदर्शक आणि त्वरित करण्याचे सरकारने ठरवले आहे. राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन माहिती प्रणाली (छऊचखड) मध्ये सर्व आकडेवारी ऑनलाइन अपलोड करावी लागेल. आमदार बबनराव लोणीकर यांनी प्रशासनाला आवाहन केले की, ही मदत कोणत्याही अडथळ्याशिवाय शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवावी. जालना जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी या पॅकेजचे मनापासून स्वागत केले असून, त्यांनी सरकारवर विश्वास व्यक्त केला आहे. लोणीकर म्हणाले, फडणवीस सरकार शेतकरीहिताचे सरकार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली हा निर्णय शेतकऱ्यांसाठी मैलाचा दगड ठरेल. ते पुढे म्हणाले, या पॅकेजमुळे शेतकरी पुन्हा नव्या जोमाने शेतीकडे वळतील आणि त्यांच्या जीवनात आशेचा प्रकाश पसरेल.

# सकारात्मक दृष्टिकोन आयुष्याचे ध्येय ठरवितो -जिल्हाधिकारी मित्तल

**जालना । प्रतिनिधी -** आजच्या जागतिकीकरण आणि तंत्रज्ञानाच्या युगात आव्हाने आहेत, याचा सामना करता आला पाहिजे. बालकुमारानी आयुष्याचे ध्येय ठरवत सकारात्मक दृष्टिकोन ठेवल्यास यशाचा, जीवनाचा मार्ग सापडतो, असा विचार जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी 'जागतिक मानसिक आरोग्य दिनानिमित्त 'आयोजित कार्यक्रमात बोलताना मांडला.. खरपुडी येथील मराठवाडा शेतीसहाय्य मंडळाच्या कृषि विज्ञान केंद्राच्या सभागृहात मानस फाऊंडेशन आयोजित कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमास जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मानस फाऊंडेशनच्या पदाधिकारी डॉ.सुजाता देवरे या होत्या. कार्यक्रमास कृषिभूषण विजय बोराडे, मानस फाऊंडेशनचे अध्यक्ष डॉ.प्रकाश आंबेकर, मानस फाऊंडेशनचे डॉ.यशवंत सोनुने, डॉ.सुहास सदावर्ते, प्रा.कल्याणराव एखंडे, प्रा.पंडीत वासरे, मुख्याध्यापक प्रशांत कोळकर, सतीश खरटमल, विनोद जैतमहाल यांची उपस्थिती होती.




जिल्हाधिकारी आशिमा मित्तल म्हणाल्या की, बालकांनी जीवनात यशस्वी व्हायचे असेल तर पहिल्यांदा आईवडिलांचा विश्वास संपादन करता आला पाहिजे. मुलांनी प्रेरणादायी विचार करावा, यासाठी ध्येय ठरवा त्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा केल्यास यशाचा मार्ग सापडतो असेही जिल्हाधिकारी यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना सागितले. चांगल्या गोष्टीची सवय ठेवत, परिश्रम करण्याची मनाची तयारी ठेवा आणि सकारात्मक दृष्टिकोन ठेवल्यास यशाचे उंच शिखर गाठता येते,असा सल्लाही विद्यार्थ्यांना जिल्हाधिकारी मित्तल यांनी दिला.

कार्यक्रमात बोलताना कृषिभूषण विजय बोराडे म्हणाले की, शारीरिक आरोग्य आपण जपतो पण आताच्या झपाट्याने बदलत जाणाऱ्या काळात मानसिक आरोग्याबद्दल जाणिव जागृती करण्याची गरज निर्माण झाली आहे. ज्ञानाचा वेग वाढला, तशी स्पर्धा प्रचंड वाढली यातही टिकायचे असेल तर मानसिक आरोग्य चांगले कसे राहील,यासाठी चालणारे मानस फाऊंडेशनचे कार्य कौतुकास्पद असल्याचेही त्यांनी यावेळी सागितले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मानस फाऊंडेशनचे डॉ. सुहास सदावर्ते, यांनी केले तर आभार हनुमंत पाटील यांनी मानले.

जागतिक मानसिक आरोग्य दिन सप्ताह समारोप समारंभात बोलताना मानस फाऊंडेशनचे अध्यक्ष डॉ.प्रकाश आंबेकर म्हणाले,की शिक्षकांनी मुलांच्या मानसिकतेचा विचार करीत 'मनाचा कल ' समजून घेता आला पाहिजे. शिक्षकांमुळेच आपण घडत असतो म्हणून शिक्षकाप्रती आदरभाव ठेवता आला पाहिजे. विद्यार्थी संवेदनशील असतो, त्याचा शारीरिक मानसिक विकास करण्याचा ध्यास असला पाहिजे,असे सांगून जीवनकौशल्य शिक्षकांनी जाणीवपूर्वक शिकविले पाहिजे,असे डॉ.प्रकाश आंबेकर यांनी सांगितले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षीय समारोपात बोलताना डॉ.सुजाता देवरे म्हणाल्या,की समाज माध्यमांच्या विविध प्रकारांनी आजच्या युवापिढीसमोर कठीण प्रसंग निर्माण होत आहे. कुणालाही मानसिक आजार होवू शकतो.त्याला लहान- मोठे, गरीब- श्रीमंत असा भेदभाव नसतो. मन सुंदर करायचे असेल पुस्तक वाचणे, आजी आजोबांच्या गोष्टी ऐकल्या पाहिजेत. 'मनातील लांडगे' या बोधकथेतून डॉ.सुजाता देवरे यांनी मनाची सुंदरता कशी जपली पाहिजे असा सल्ला विद्यार्थ्यांना दिला.

# वडीकाळ्या येथील गट क्रमांक ७८ मधील वीजवाहक तारामध्ये शॉर्टसर्किटमुळे ऊस पिकाचे नुकसान

**धाकलगांव । प्रतिनिधी -** शेतातून गेलेले वीजवाहक तारामध्ये शॉर्ट सर्किट होऊन उसाला आग लागल्याच्या अनेक घटना घडलेल्या आहेत. यामध्ये शेतकऱ्याचे मोठ्या प्रमाणात नुकसान होते. मात्र वीज वितरण कंपनी अद्यापही कोणतेही उपयोजना करताना दिसत नाही.अंबड तालुक्यातील वडिकाळ्या शिवारातील गट नं.७८ येथील शेतकरी किरण विठ्ठलराव जंगले यांचा १ हेक्टर ६० आर. व देविदास किनसराव जंगले यांचा २ हेक्टर यांच्या शेतातून गेलेल्या वीजवाहक तारामध्ये शॉर्टसर्किट होऊन ऊस जळून फार मोठे नुकसान झाले आहे. या नुकसानीमुळे शेतातील सिंचनाचे काम ठप्प झाले असून शेतकऱ्यांना दहा ते पंधरा लाखाचा आर्थिक फटका बसला आहे.



या संदर्भात शेतकऱ्यांनी महावितरण उपविभाग, अंबड कार्यालयाकडे नुकसानभरपाई मिळावी म्हणून निवेदन सादर केले आहे. ग्राम महसूल अधिकारी यांनी पंचनामा करून अहवाल तहसील कार्यालयाकडे पाठविण्यात आला आहे. संबंधित प्रशासकीय अधिकाऱ्यांनी तात्काळ नुकसानभरपाई देण्याची मागणी शेतकऱ्याकडून होत आहे.

पंचनामा करता वेळी उपस्थित महसूल अधिकारी तुपकर साहेब, सरपंच रमेश काळे,शिवाजी नाझरकर, प्रल्हाद जंगले होते.

## दिव्यांग लाभार्थींसाठी शिबीराचे आयोजन

**जालना । प्रतिनिधी -** सामाजिक न्याय व विशेष सहाय विभागाकडून संजय गांधी निराधार योजनेतील दिव्यांग लाभार्थींचे मासिक अर्थसहाय १५०० रुपयावरुन २५०० रुपये करण्याच्या अनुषंगाने जालना शहरातील दिव्यांग लाभार्थ्यांची यादी तहसील कार्यालयातील नोटीस बोर्डवर डकविण्यात आली आहे. दिव्यांगासाठी मंगळवार दि.१४ ऑक्टोबर २०२५ रोजी सकाळी ११ वाजता जालना तहसील कार्यालयात शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. तरी शिबीरात ऑनलाईन दिव्यांग प्रमाणपत्र, युडीआयडी कार्ड, अद्यावत आधारकार्ड व बँक पासबुकाच्या छायांकित प्रतिसह हजर रहावे, असे आवाहन तहसीलदार छाया पवार यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.

# रामतिर्थ स्मशानभुमीकडे जाणाऱ्या रस्त्याची दुरूस्तीची मागणी

**जालना । प्रतिनिधी -** शहरातील रामतिर्थ स्मशानभुमीकडे जाणाऱ्या रस्त्याची अंत्यत दुरावस्था झाली आहे. सदरील रस्त्याची तात्काळ दुरूस्ती करावी अशी मागणी परशुराम जन्म उत्सव समिती जालनाचे माजी अध्यक्ष श्रीपाद त्रिंबकराव रत्नपारखी व ॲड. विनोद कुलकर्णी यांनी केली आहे.

याबाबत जालना शहर महापालिकेचे अति. आयुक्त गिराम यांना दिलेल्या निवेदनात म्हटले की, शहरातील रामतिर्थ स्मशानभुमीकडे जाणाऱ्या रस्त्याची अत्यंत भयावह अवस्था आहे. पुलाखालील रस्त्याने अंत्ययात्रा घेवून जातांना दुःखात असलेल्या बांधवांना त्रास सहन करावा लागत आहे. रस्त्याच्या दुरावस्थेमुळे एखादवेळेस अंत्ययात्रेत स्वर्गरथाचा अपघात होवून दुर्घटना घडू शकते. रस्त्याची तात्काळ दुरूस्ती करावी व स्मशानभुमीसमोर वाहनाचा वेग नियंत्रीत रहावा यासाठी येथे वेग मर्यादा व दिशाफलक लावण्यात यावे अशी मागणी निवेदनात करण्यात आली. निवेदनावर इंजि. श्रीपाद रत्नपारखीख ड. विनोद कुलकर्णी, सिध्देश्वर पिंपरकर, मयुर लोखंडे यांनी केली आहे.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.